# मत्पिय देशबांधवांनो !

## स्वाध्याय

### परिच्छेद १

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १५ वरील (ओळ १ ते १६) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

[हौदाचा बंगला ......................

............... आगीत उडी घातली.]


अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. सत्त्वधीर २. पुण्यश्लोक
३. नृपश्रेष्ठ

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. पुढे काय २. काय सांगावे.


**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. मन मोहून जाईल.

२. अंत:करण द्रवून जाईल.

**कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. स्वत:चे चरित्र लोकांना सांगावे.

२. स्वत:च्या चरित्रातील रमणीय प्रसंगांनी चित्त वेधावे.

**कृ.५. चौकट पूर्ण करा.**

१. **सिनेमाग्राफीची नवीन कल्पना उदित झाल्यावर, आंधळे होत असतानाही लेखकाने हे केले** → [ ]

२. **हे पत्र येथून लिहिले आहे** → [ ]

**उत्तर:** १. पुढील आगीत उडी घातली.

२. हौदाचा बंगला, नाशिक.

**कृ.६. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. राजा हरिश्चंद्राच्या चित्रपटातील काही संस्मरणीय चित्रांनी आपले ______ .

अ. स्वरूप स्वजनांस कळेल.

ब. मन मोहून जाईल.

क. बुद्धी कुंठित होईल.

ड. स्वदेशहित साधेल.

२. माझ्या चरित्रातील काही रमणीय प्रसंगांनी आपले चित्त वेधावे ______ .

अ. असा माझा मोठेपणा नाही.

ब. असाही माझा हेतू नाही.

क. असा माझा विचार नाही.

ड. असा माझा पराक्रम नाही.

**उत्तर:** १. राजा हरिश्चंद्राच्या चित्रपटातील काही संस्मरणीय चित्रांनी आपले **मन मोहून जाईल.**

२. माझ्या चरित्रातील काही रमणीय प्रसंगांनी आपले चित्त वेधावे **असाही माझा हेतू नाही.**

**कृ.७. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखकाने 'राजा हरिश्चंद्र' या चित्रपटाची निर्मिती केली.

२. लेखकाचे वास्तव्य हौदाचा बंगला, नाशिक येथे आहे.

३. चित्रपटनिर्मिती करण्यापूर्वी लेखक सरकारी नोकरी करत होते.

४. लेखकाचा प्रस्तुत पत्रलेखनाचा हेतू स्वत:चे चरित्र इतरांना सांगणे हा आहे.

**उत्तर:** १. सत्य  २. सत्य

३. सत्य  ४. असत्य

**कृ.८. सहसंबंधानुसार योग्य जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | फोटोग्राफीमध्ये नवे शोध लावण्यासाठी | अ. | आंधळे होत असतानाही आगीत उडी मारली. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | हिंदुस्थानात नाव गाजावे यासाठी | ब. | रात्रीचे दिवस केले. |
| ३. | सिनेमाग्राफीची नवीन कल्पना सुचल्यावर | क. | सरकारी नोकरीला लाथ मारली. |

**उत्तर:** (१ - ब),(२ - क), (३ - अ)

## कृ.९. प्रश्न तयार करा.

१. 'फोटोग्राफी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'सिनेमाग्राफी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. कशामध्ये शोध लावण्यासाठी लेखकाने रात्रीचे दिवस केले?

२. लेखकाच्या अंत:करणात कशाची नवीन कल्पना उदित झाली?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांना उताऱ्यातील पर्यायी शब्द शोधा.**

१. अवघड :

२. सुरुवात :

३. मती :

४. हृदय :

५. गरिबी :

६. उद्देश :

**उत्तर:** १. कठीण २. आरंभ

३. बुद्धी ४. अंत:करण

५. दारिद्र्य ६. हेतू

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

१. आपले सत्त्व प्राणपणाने जपणारा :

२. नित्य स्मरणात राहण्यासारखे :

**उत्तर:** १. सत्त्वधीर २. संस्मरणीय

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. मन, अंत:करण, चरित्र, चित्त.

२. यथातथ्य, सत्त्वधीर, पुण्यश्लोक, नृपश्रेष्ठ.

**उत्तर:** १. चरित्र २. यथातथ्य

**कृ.४. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

१. **मन मोहून जाणे** : मन आकर्षित होणे.

**वाक्य:** पावसाळ्यातील हिरवीगार वनराई पाहून सोनमचे **मन मोहून गेले.**

२. **अंत:करण द्रवून जाणे** : मन भरून येणे, दु:ख होणे.

**वाक्य:** अब्दुल कलामांसारख्या थोर वैज्ञानिकाच्या मृत्यूने अवघ्या भारताचे **अंत:करण द्रवून गेले.**

३. **उदय होणे** : निर्माण होणे.

**वाक्य:** नवीन सरकार येण्याने जनतेच्या मनात अनेक आकांक्षाचा **उदय झाला.**

४. **बुद्धी कुंठित होणे** : विचार थांबणे, सुचेनासे होणे.

**वाक्य:** मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या बातमीने मुंबईकरांची **बुद्धी कुंठित झाली.**

**कृ.५. वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या जोड्या जुळवा.**

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| १. | चित्त वेधणे | अ. | मनात येणे |
| २. | रात्रीचे दिवस करणे | ब. | स्वत:हून संकटात जाणे |
| ३. | अंत:करणात उदित होणे | क. | खूप कष्ट घेणे |
| ४. | आगीत उडी मारणे | ड. | लक्ष वेधणे |

**उत्तर:** (१ - ड), (२ - क), (३ - अ), (४ - ब)

**कृ.६. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

१. पाप [ ] श्लोक

२. चित्र [ ] संख्या

**उत्तर:** १. पापपुण्य, पुण्यश्लोक

२. चित्रपट, पटसंख्या

**कृ.७. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

मानवी आयुष्यात कलेला महत्त्वाचे स्थान आहे; कारण ________.

**उत्तर:** १. मानवी आयुष्यात कलेला महत्त्वाचे स्थान आहे; कारण **कलेमुळे मानवी आयुष्याला सौंदर्य व संस्कृतीची जोड मिळते.**

२. मानवी आयुष्यात कलेला महत्त्वाचे स्थान आहे; कारण **कला हे अभिव्यक्तीचे उत्तम साधन आहे.**

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | हरिश्चंद्राच्या | | |
| २. | दारिद्र्यपंकात | | |
| ३. | आपणांस | | |

उत्तर:

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | हरिश्चंद्राच्या | च्या | षष्ठी |
| २. | दारिद्र्यपंकात | त | सप्तमी |
| ३. | आपणांस | स | द्वितीया/ चतुर्थी |

**कृ.२. वाक्यातील अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

ज्या सत्त्वधीर व पुण्यश्लोक नृपश्रेष्ठांचे चरित्र चित्रपटाचे रूपाने मी आपणापुढे आज ठेविले आहे.

**उत्तर:** व – उभयान्वयी अव्यय

आपणापुढे – शब्दयोगी अव्यय

आज – क्रियाविशेषण अव्यय

**कृ.३. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. नृपश्रेष्ठ २. यथातथ्य ३. दारिद्र्यपंक

**उत्तर:**

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | नृपश्रेष्ठ | श्रेष्ठ असा नृप | कर्मधारय समास |
| २. | यथातथ्य | यथा (असे) तथ्य | कर्मधारय समास |
| ३. | दारिद्र्यपंक | दारिद्र्यरूपी पंक | कर्मधारय समास |

**कृ.४. कंसातील सूचनेनुसार खालील वाक्यांचा काळ बदला.**

१. मी पुढील आगीत उडी घातली.

**(अपूर्ण भविष्यकाळ करा.)**

**उत्तर:** मी पुढील आगीत उडी घालत असेन.

२. संस्मरणीय चित्रांनी आपले मन मोहून जाईल.

**(पूर्ण भूतकाळ करा.)**

**उत्तर:** संस्मरणीय चित्रांनी आपले मन मोहून गेले होते.

कृ.५. वाक्य व वाक्याच्या प्रकारांच्या जोड्या जुळवा.

| | वाक्य | | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | आरंभीचे नमन मी केले, पण पुढे काय? काय सांगावे? | अ. | नकारार्थी |
| २. | माझा हेतू चरित्र आपणास सांगावे असा नाही. | ब. | विधानार्थी |
| ३. | फोटोग्राफीमध्ये काही नवे शोध लावावेत म्हणून रात्रीचे दिवस केले. | क. | प्रश्नार्थी |

उत्तर: (१ - क), (२ - अ), (३ - ब)

### कृ.६. खालील कोष्टक पूर्ण करा.

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| १. | व्यक्ती | |
| २. | | ओळी |
| ३. | | दिवस |
| ४. | कहाणी | |

**उत्तर:**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| १. | व्यक्ती | **व्यक्ती** |
| २. | **ओळ** | ओळी |
| ३. | **दिवस** | दिवस |
| ४. | कहाणी | **कहाण्या** |

### कृ.७. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.

१. (हरिशचंद्र) (हरिश्चंद्र) (हरीश्चंद्र) (हरीशचंद्र)

२. (पुण्यश्लोक) (पूण्यश्लोक) (पुण्यष्लोक) (पूण्यष्लोक)

**उत्तर:** १. हरिश्चंद्र २. पुण्यश्लोक

### कृ.८. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.

१. आरंभीचे नमन मी केले पण पुढे काय काय सांगावे

**उत्तर:** आरंभीचे नमन मी केले, पण पुढे काय? काय सांगावे?

२. व्यक्ती लहान असो वा थोर असो प्रत्येक व्यक्तीला चरित्र हे आहेच

**उत्तर:** व्यक्ती लहान असो वा थोर असो, प्रत्येक व्यक्तीला 'चरित्र' हे आहेच.

### ड. माझे मत

**कृ.१. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आयुष्य झोकून देणाऱ्या एखाद्या व्यक्तीची थोडक्यात माहिती द्या.**

**उत्तर:** बिहारमधील गहलौर या खेडेगावातील दशरथ मांझी या गरीब मजुराने एकट्याने २२ वर्षे डोंगर पोखरून दोन गावांना जोडणारा रस्ता खोदून काढला. यासाठी त्यांनी दिवसरात्र डोंगर फोडायचे काम केले, तेही केवळ हातोडी आणि छिन्नीचा वापर करून. डोंगर चढून पतीसाठी भोजन नेताना त्यांची पत्नी तोल जाऊन पडली व डोंगराला वळसा घालून इस्पितळात पोहोचण्याआधीच तिचे निधन झाले. त्यानंतर दशरथ मांझी यांनी डोंगर फोडून रस्ता बनविण्याचा ध्यासच घेतला आणि २२ वर्षांच्या कठोर मेहनतीनंतर त्यांनी ही अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली. बिहार सरकारने त्यांना सन्मानित करून 'माऊंटन मॅन' ही पदवीही बहाल केली.

## परिच्छेद २


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १५ वरील (ओळ १६ ते २४) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[सोन्यासारख्या बायकोमुलांचे ......................**

**...................... पुन्हा चूर होतो.]**

**अ. आकलन**


कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. लेखकाचे एकनिष्ठ कुटुंब

२. इमानी नोकर

कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.




उत्तर: १. कलेच्या उद्धारासाठी तीन वेळा युरोपला गेले.

२. पत्नी व अर्भकाला कारखान्यातच कामाला लावले.

३. हिय्येबाजपणे कटू काळाला टक्कर दिली.

### कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.

लेखक पुनश्च व्यवसायात चूर होण्यामागील कारणे

१ | २

उत्तर: १ देशाच्या प्रियमूर्तींची आठवण

२. एक विलक्षण प्रेरणा

### कृ.४. चौकट पूर्ण करा.

१. लेखकाने यांचे ममतारूप दृढपाश तोडले → [ ]

२. लेखकाने निवडलेला सिनेमाग्राफीचा मार्ग याच्यापेक्षा खडतर आहे → [ ]

उत्तर: १. सोन्यासारख्या बायकोमुलांचे.

२. परमेश्वर प्राप्तीच्या मार्गापेक्षा.

**कृ.५. खालील प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय शोधून लिहा.**

१. प्रिय पत्नीला आणि अर्भकाला कारखान्यातच कामाला लावून, हाच आपला संसार ______

अ. अशी जाणीव करून दिली.

ब. अशी महती पटवली.

क. अशी समजूत करून दिली.

ड. अशी कर्तव्यपूर्ती सांगितली.

२. अशा गोष्टींनी चरित्र रंगवून स्वत:ची महती लोकांपुढे गावी म्हणून मी ______

अ. चित्रपट बनवलेला नाही.

ब. शब्द उच्चारले नाहीत.

क. लेखणी उचललेली नाही.

ड. धाडस केलेले नाही.

**उत्तर:** १. प्रिय पत्नीला आणि अर्भकाला कारखान्यातच कामाला लावून, हाच आपला संसार **अशी समजूत करून दिली.**

२. अशा गोष्टींनी चरित्र रंगवून स्वत:ची महती लोकांपुढे गावी म्हणून मी **शब्द उच्चारले नाहीत.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखक चित्रपटनिर्मितीचे प्रशिक्षण घेण्यासाठी तीनवेळा युरोपला गेले होते.

२. लेखकाच्या डोळ्यांपुढे देवाच्या आठवणींबरोबर देशाची प्रियमूर्ती उभी राहते.

३. सिनेमाग्राफीपेक्षा परमेश्वरप्राप्तीचा मार्ग खडतर आहे, असे लेखकाला वाटते.

४. लेखकाच्या कुटुंबाने व इमानी नोकरांनी कटू काळाचा धडाडीने सामना केला.

**उत्तर:** १. सत्य    २. सत्य

३. असत्य    ४. सत्य

**कृ.७. सहसंबंधानुसार योग्य जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | कलांचा ध्यास | अ. | कटू काळाला टक्कर दिली. |
| २. | पत्नी व अर्भक | ब. | तीन वेळा युरोपवारी केली. |
| ३. | एकनिष्ठ कुटुंब व इमानी नोकर | क. | परमेश्वराच्या शोधार्थ पर्वत गाठण्याची इच्छा झाली. |
| ४. | हालअपेष्टांतून मुक्तता | ड. | कारखान्यातच कामाला लावले. |

**उत्तर:** (१ - ब), (२ - ड), (३ - अ), (४ - क).

**कृ.८. प्रश्न तयार करा.**

१. 'युरोप' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'नोकर' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. लेखक तीन वेळा कोणत्या खंडात धावून गेले?

२. लेखकाला कोण फार इमानी लाभले?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. खडतर : | ☐ | २. प्रेरणा : | ☐ |
| ३. टक्कर : | ☐ | ४. पत्नी : | ☐ |

**उत्तर:** १. अवघड २. स्फूर्ती

३. संघर्ष ४. भार्या

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. प्रिय × | ☐ | २. इमानी × | ☐ |
| ३. कटू × | ☐ | ४. स्मरण × | ☐ |

**उत्तर:** १. अप्रिय २. बेइमान

३. गोड ४. विस्मरण

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

पत्नी, अर्भक, परमेश्वर, नोकर.

**उत्तर:** परमेश्वर

**कृ.४. खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखून त्याचा अर्थ लिहा.**

१. महापुरात गावकऱ्यांनी अतिशय धीराने काळाला टक्कर दिली.

२. आपल्या मुलाची प्रगती पाहून तात्यांचे हृदय उचंबळून आले.

३. आजची पिढी मोबाईलमध्ये चूर झाली आहे.

४. दहावीच्या परीक्षेत चांगल्या प्रकारे यशस्वी होण्याचा सचिनने ध्यास घेतला.

५. काही लोक उगाच स्वत:ची महती गात असतात.

**उत्तर:** १. **काळाला टक्कर देणे** : संकटावर मात करणे.

२. **हृदय उचंबळून येणे** : तीव्र आवेगाने भावना जागृत होणे.

३. **चूर होणे** : मग्न होणे, आकंठ बुडणे.

४. **ध्यास घेणे** : एखाद्या गोष्टीची तीव्र तळमळ असणे.

५. **महती गाणे** : मोठेपणा सांगणे.

**कृ.५. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | दृढ : | | |
| २. | सुख : | | |
| ३. | प्रिय : | | |
| ४. | एक : | | |

उत्तर: १. दृढपाश, दृढनिश्चय

२. सुखसोयी, सुखशांती

३. प्रियमूर्ती, प्रियजन

४. एकनिष्ठ, एकवचनी

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. परिच्छेदाच्या आधारे विशेषणे व विशेष्ये यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

**विशेषणे :** ममतारूप | सांसारिक | एकनिष्ठ | खडतर

**विशेष्ये :** कुटुंब | मार्ग | दृढपाश | सुखसोयी

उत्तर: १. ममतारूप दृढपाश

२. सांसारिक सुखसोयी

३. एकनिष्ठ कुटुंब

४. खडतर मार्ग

### कृ.२. खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | पत्नीला | अ. | तृतीया |
| २. | गोष्टींनी | ब. | षष्ठी |
| ३. | सिनेमाग्राफीचा | क. | सप्तमी |
| ४. | कारखान्यात | ड. | द्वितीया |

**उत्तर:** (१ - ड), (२ - अ), (३ - ब), (४ - क)

### कृ.३. वाक्यांतील अधोरेखित अव्ययांचा प्रकार लिहा.

१. सोन्यासारख्या बायकोमुलांचे दृढपाश तटकन तोडून ज्या कलांचा ध्यास घेतला होता त्यांच्या उद्धारार्थ तीन वेळा युरोप खंडात धावून गेलो.

**उत्तर:** सोन्यासारख्या - शब्दयोगी अव्यय

तटकन - क्रियाविशेषण अव्यय

२. छे छे ! अशा गोष्टींनी चरित्र रंगवून स्वत:ची महती लोकांपुढे गावी म्हणून मी शब्द उच्चारले नाहीत.

**उत्तर:** छे छे - केवलप्रयोगी अव्यय

लोकांपुढे - शब्दयोगी अव्यय

म्हणून - उभयान्वयी अव्यय

### कृ.४. खालील कोष्टक पूर्ण करा.

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | दृढपाश | | |
| २. | प्रियमूर्ती | | |
| ३. | | परम् असा ईश्वर | |

**उत्तर:**

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | दृढपाश | **दृढ असा पाश** | **कर्मधारय समास** |
| २. | प्रियमूर्ती | **प्रिय अशी मूर्ती** | **कर्मधारय समास** |
| ३. | **परमेश्वर** | परम् असा ईश्वर | **कर्मधारय समास** |

**कृ.५. खालील शब्दांचे लिंग बदला.**

१. पत्नी   २. देव

**उत्तर:** १. पती   २. देवी

**कृ.६. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. संसारीक   २. सिनेमाग्राफि

३. एकनीश्ठ   ४. प्रीयमुर्ती

**उत्तर:** १. सांसारिक   २. सिनेमाग्राफी

३. एकनिष्ठ   ४. प्रियमूर्ती

**कृ.७. वाक्यांतील विरामचिन्हे ओळखा.**

१. छे छे ! अशा गोष्टींनी चरित्र रंगवून स्वत:ची महती लोकांपुढे गावी म्हणून मी शब्द उच्चारले नाहीत.

**उत्तर:** (!) - उद्‌गारवाचक चिन्ह, (.) - पूर्णविराम

२. सिनेमाग्राफीचा नाद, सध्याच्या घटकेत होणाऱ्या हालअपेष्टांतून मुक्त होण्याकरिता एकदम परमेश्वराच्या शोधार्थ एखादा पर्वत गाठावा, अशी न कळत इच्छा झाल्यावाचून राहात नाही.

**उत्तर:** (,) - स्वल्पविराम, (.) - पूर्णविराम

**ड. माझे मत**

**कृ.१. 'स्वप्न पाहणे सोपे असते, पण ते पूर्ण करणे अवघड असते' याबद्दल तुमचे मत मांडा.**

**उत्तर:** वरील विधान मला पूर्णपणे पटते. स्वप्ने पाहावीत, मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती सत्यात उतरविण्यासाठी अहोरात्र झटावे. आजवर ज्या ज्या महान व्यक्तींनी आपली स्वप्ने प्रत्यक्षात आणली, त्यांच्यामागे मोठा जीवनसंघर्ष आहे. वेळप्रसंगी पडेल ते काम करून, हालाखीत दिवस काढून, अपमान सहन करून, आपल्या मनातील ध्येयावरची निष्ठा ढळू न देता ही माणसे संघर्ष करत राहिली आणि म्हणूनच त्यांची स्वप्ने पूर्ण झाली. छोट्याशा खेड्यातले डॉ. अब्दुल कलाम यांचा शास्त्रज्ञ होण्याचा संघर्ष असो, की कुटुंबाला आधार देतानाच संगीतक्षेत्रात स्वत:चे अढळ स्थान निर्माण करणाऱ्या स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर असोत, या सर्वांनी परिस्थितीवर मात करून आपली स्वप्नं साकार केली आहेत. त्यामुळे स्वप्न पाहणे सोपे असते; पण ते पूर्ण करणे ही एक मोठी व अवघड जबाबदारी असते. मात्र आपले स्वप्न प्रत्यक्षात आलेले पाहण्याचा आनंद निराळाच असतो.

## परिच्छेद ३


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १६ वरील (ओळ २५ ते ३७) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[चित्रपट तयार करण्यात ......................**

**...................... चित्रपटसृष्टीचे जनक)]**

### अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. रग्गड स्तुती.

२. सुवर्णपदके प्रदान करणे.

३. फुले उधळणे.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. तीन नाटकांवर मिळविलेले साठ-सत्तर हजार रुपये.

२. सावकाराचे व्याजासह झालेले पन्नास हजार.

क्र.३. ओघतक्ता पूर्ण करा.

दादासाहेबांच्या अंत:करणातून निघालेले शब्द देशबांधवांना सांगण्यामागची तळमळ

↓

फिल्मवरील उत्पन्नाचा झरा कायम राहावा

↓

१

↓

२

↓

३

↓

४

↓

५

उत्तर: १. कर्जमुक्त व्हावे.

२. देशात कलेला कायमचे निवासस्थान मिळावे.

३. कलेचा उत्कर्ष व्हावा.

४. शिक्षणाद्वारे लोककल्याणाकडे कलेचा उपयोग व्हावा.

५. कला हे शेकडो जणांच्या चरितार्थाचे साधन व्हावे.

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| १. | **पुढे काय? या प्रश्नाचे उत्तर देताना स्तुतिपाठक असे बनतात** → | |
| २. | **दादासाहेब फाळके यांचे पूर्ण नाव** → | |
| ३. | **यामुळे दादासाहेब शेकडो गिऱ्हाईकांना दूर लोटत** → | |

**उत्तर:** १. बर्फापेक्षाही थंडगार.

२. धुंडीराज गोविंद फाळके.

३. वर्किंग कॅपिटल नसल्याने.

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. चित्रपट तयार करण्यात जे यश ईश्वरकृपेने मला लाभले, त्याबद्दल कित्येक लोक ______

अ. मला नावे ठेवतात.

ब. मला पुरस्कार देतात.

क. माझी रग्गड स्तुती करतात.

ड. पैशांची मागणी करतात.

२. सावकाराचे व्याज चढत आहे, कारखान्याचा खर्च ______.

अ. अंगावर सोसणे भाग आहे.

ब. कमी करणे भाग आहे.

क. इतरांना सांगणे भाग आहे.

ड. बंद करणे भाग आहे.

**उत्तर:** १. चित्रपट तयार करण्यात जे यश ईश्वरकृपेने मला लाभले त्याबद्दल कित्येक लोक **माझी रग्गड स्तुती करतात.**

२. सावकाराचे व्याज चढत आहे, कारखान्याचा खर्च **अंगावर सोसणे भाग आहे.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखकाला चित्रपटनिर्मितीत मिळालेल्या यशामुळे लोक नावे ठेवतात.

२. सिनेमाच्यापायी लेखक हजारो रुपयांच्या कर्जात आला आहे.

३. 'चित्रपट' निर्मितीच्या कलेला देशात कायमचे स्थान मिळावे, यासाठी लेखक तळमळीने हे पत्र लिहीत आहे.

४. लेखकाला भारतीय 'नाट्यसृष्टीचे जनक' असे म्हटले जाते.

**उत्तर:** १. असत्य २. सत्य

३. सत्य ४. असत्य

**कृ.७. सहसंबंधानुसार योग्य जोड्या जुळवा.**

| | घटना | | परिणाम |
|---|---|---|---|
| १. | चित्रपटाला यश प्राप्त | अ. | स्तुतिपाठक थंडगार बनतात. |
| २. | पुढे काय? असा प्रश्न | ब. | शेकडो गिऱ्हाईकांना दूर लोटावे लागते. |
| ३. | वर्किंग कॅपिटलचा अभाव | क. | लोक फुलांची उधळण करतात. |

**उत्तर:** (१ - क), (२ - अ), (३ - ब)

**कृ.८. प्रश्न तयार करा.**

१. 'फुले' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'सावकार' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. लोक थिएटरमध्ये लेखकावर काय उधळतात?

२. लेखकाने कोणाकडून कर्ज घेतले आहे?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. यश : अपयश : : स्तुती :

२. रात्र : : : उत्कर्ष : प्रगती

**उत्तर:** १. निंदा २. रजनी

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

निव्वळ स्तुती करणारे :

**उत्तर:** स्तुतिपाठक


**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. उत्पन्न, उत्कर्ष, कर्ज, रुपये

२. गोविंद, सेवक, धुंडीराज, दादासाहेब

**उत्तर:** १. उत्कर्ष २. सेवक

**कृ.४. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**




**उत्तर:** निवास, वास, स्थान, नवा, नस, सन.

कृ.५. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.

वेडेवाकडे

वेडे | वाकडे | कडे | कावा | वाडे

**उत्तर:** कावा

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे परिच्छेदातील सामान्यरूप शोधून लिहा.**

१. ईश्वरकृपा २. प्रश्न

३. जीव ४. देशबांधव

**उत्तर:** १. ईश्वरकृपे २. प्रश्ना

३. जिवा ४. देशबांधवां

**कृ.२. खालील अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

१. पेक्षा २. व

३. मध्ये

**उत्तर:** १. बबनरावांच्या उत्पन्ना**पेक्षा** त्यांचा खर्च जास्त होता.

२. साधनाताईंनी नोकरी सोडली **व** स्वत:ला समाजकार्याला वाहून घेतले.

३. लहान वयापासूनच आर्या गाण्याच्या स्पर्धां**मध्ये** बक्षिसे मिळवत असे.

**कृ.३. कंसातील पर्यायांतून वाक्यांचा प्रकार ओळखा.**
**(विधानार्थी, नकारार्थी, प्रश्नार्थी)**

१. पण पुढे काय?

२. सावकारांचे व्याज वाढत आहे.

**उत्तर:** १. प्रश्नार्थी २. विधानार्थी

**कृ.४. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

१. फार काय पण मजवर थीएटरमधे फूलेही उधळतात.

**उत्तर:** फार काय पण मजवर **थिएटरमध्ये फुलेही** उधळतात.

२. दोन शब्द मोठ्या कश्टाने घालित आहे.

**उत्तर:** दोन शब्द मोठ्या **कष्टाने घालीत** आहे.

**कृ.५. चुकीची विरामचिन्हे बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. कित्येक लोक माझी रग्गड स्तुती करतात. सुवर्णपदके देतात,

**उत्तर:** कित्येक लोक माझी रग्गड स्तुती करतात, सुवर्णपदके देतात.

२. पण पुढे काय ! या प्रश्नाचे उत्तर देण्याची वेळ आली की हे सर्व स्तुतिपाठक बर्फापेक्षाही थंडगार बनतात?

**उत्तर:** पण पुढे काय ? या प्रश्नाचे उत्तर देण्याची वेळ आली, की हे सर्व स्तुतिपाठक बर्फापेक्षाही थंडगार बनतात.

**ड. माझे मत**

**कृ.१. तुम्हाला एखाद्या कलेची आवड आहे का? ती कला जोपासण्यासाठी तुम्ही काय करता?**

**उत्तर:** साधारणत: प्रत्येक व्यक्तीच्या अंगी एखादी तरी कला असतेच. ती कला जोपासणे महत्त्वाचे असते. मला अभ्यासासोबतच नृत्यकलेचे वेड आहे. लहानपणापासूनच ह्या कलेने मला आकर्षित केले. माझी आवड पाहून पालकांनी मला शास्त्रीय नृत्याच्या प्रशिक्षणाला पाठवले. मी गेली ८ वर्षे भरतनाट्यम् हा नृत्यप्रकार शिकत असून मला आईवडिलांचे प्रोत्साहन व गुरूंचे उत्तम मार्गदर्शन लाभले आहे. या कलेत जास्तीत जास्त नैपुण्य मिळावे यासाठी मी प्रयत्नशील असते. मी नित्यनेमाने सराव करते. त्या कलेचा अवमान होणार नाही ह्याची काळजी घेते. माझ्यासारखीच नृत्याची आवड असणाऱ्यांना पुढे जाऊन मार्गदर्शन करण्याचा माझा मानस आहे.

## सारांश लेखन

**'मत्प्रिय देशबांधवांनो' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

'मत्प्रिय देशबांधवांनो' हा पाठ म्हणजे देशबांधवांना उद्देशून दादासाहेबांनी लिहिलेले पत्र आहे. १९३९ साली लिहिलेल्या या पत्रात सुरुवातीला दादासाहेबांनी राजा हरिश्चंद्र व त्यांच्यावरील चित्रपटाचे यथातथ्य स्वरूप सांगण्याचा आपला हेतू स्पष्ट केला आहे. या चित्रपटाच्या निर्मितीच्या काळात त्यांनी अपार कष्ट सोसले, अनेक कठीण प्रसंगांना तोंड दिले. यासाठी त्यांची साथ देणाऱ्या एकनिष्ठ कुटुंबाचे व इमानी नोकरांचेही त्यांनी आपल्या पत्रात स्मरण ठेवले आहे. एका क्षणी परमेश्वरप्राप्तीचा मार्ग सिनेमाग्राफीच्या मार्गापेक्षा सोपा वाटला असल्याचे ते नमूद करतात. सिनेमाच्या यशाचे कौतुक करणारे अनेक असले, तरी आर्थिक मदत करणारे न भेटल्याची खंत त्यांच्या पत्रातून ते व्यक्त करतात. आपल्या कलेचा उत्कर्ष होऊन ती शेकडो जणांच्या चरितार्थाचे साधन व्हावे ही त्यांची तळमळ या पत्रात प्रकर्षाने जाणवते.